POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५२ ● मुंबई, बुधवार, २३ जूले २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## गोवंडीतील इंग्रजी शाळा तात्काळ बंद करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

## मुलांच्या शिक्षणाचे काय?

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी गोवंडी (पश्चिम) येथील शिवाजी नगरमधील एका प्राथमिक शाळेला 'तत्काळ बंद' करण्याचे आदेश दिले आहेत. शाळेच्या बेकायदेशीर कामकाजाचे कारण देत न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि आरिफ डॉक्टर यांनी 'ती याचिकाकर्त्यानें सील करावी,' असे म्हटले आहे, की अनधिकृत शैक्षणिक संस्थेला काम करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही.

अब्राहम एज्युकेशन ट्रस्ट, जे २०१९ पासून रेड हार्ट इंग्लिश स्कूल चालवत आहे, त्यांनी १० फेब्रुवारी रोजी एम/ईस्ट वॉर्डने जारी केलेल्या पाडकामाच्या नोटिशीला आव्हान दिले होते. ट्रस्टने १९९० पासून इमारतीचे अस्तित्व दर्शवण्यासाठी व्यावसायिक फोटो पास आणि विजेचे बिल यासारखी कागदपत्रे सादर केली, असा युक्तिवाद करत की पावसाळ्यात शाळा पाडल्याने मुलांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होईल.

न्यायाधीशांनी या प्रकरणातील 'अत्यंत त्रासदायक तथ्ये' व्यक्त केली, शाळेत जवळजवळ ४०० विद्यार्थी असतानाही, राज्य शिक्षण विभाग किंवा बीएमसीकडून आवश्यक परवानग्यांशिवाय आणि 'अत्यंत अनधिकृत



जागेतून' शाळा चालवली जात होती यावर त्यांनी भर दिला. त्यांनी म्हटले, 'याहून अधिक धक्कादायक परिस्थिती असू शकत नाही. एक अनधिकृत शाळा आणि तीही अशा बेकायदेशीर जागेत, सहन केली जाऊ शकत नाही. बेकायदेशीर आणि अपरिचित शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांचे भवितव्य काय असेल, हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

'न्यायालयाने राज्याच्या प्रतिज्ञापत्राचा संदर्भ दिला, ज्यात प्राथमिक शिक्षण बीएमसीच्या अखत्यारीत येते आणि बीएमसीच्या शिक्षण अधिकाऱ्याने २०१९ पासून शाळेला काम थांबवण्यासाठी अनेक नोटिसा पाठवल्या होत्या. न्यायाधीशांनी नमूद केले की, या नोटिसा असूनही, याचिकाकर्त्याने 'निर्भयपणे शाळा चालू ठेवली' असे दिसते.

त्यांना हे देखील कळवण्यात आले की, बेकायदेशीर बांधकामावर कारवाई करण्याच्या प्रयत्नांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. न्यायाधीशांनी ट्रस्टला दोन दिवसांच्या आत एम/ईस्ट वॉर्डमध्ये आणि शिवाजी नगर पोलिस स्टेशनला एक प्रत, शाळेच्या बंदची पुष्टी करणारी, नवीन प्रवेश बंद झाल्याची, आणि सर्व विद्यमान विद्यार्थी व अधिकाऱ्यांना सूचित केल्याची, तसेच सील केलेल्या छायाचित्रांसह प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

बीएमसी आणि पोलिसांनी गुरुवारी पुढील सुनावणीत सर्व संबंधित सामग्री उच्च न्यायालयात सादर करायची आहे. न्यायालयाने इशारा दिला की, प्रतिज्ञापत्र सादर करण्यात अयशस्वी झाल्यास, त्यांना योग्य पोलिस संरक्षणासह शाळेच्या सक्तीच्या बंदसाठी पुढील आदेश जारी करण्यास भाग पडेल. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, एकदा कायदेशीर इमारत बांधली गेल्यास, ट्रस्टला शाळा चालवण्यासाठी आवश्यक परवानग्यांसाठी अर्ज करण्यास स्वातंत्र्य असेल, परंतु सध्याची बंद करण्याची कारवाई पूर्ण झाल्यानंतरच.

## विधानसभा अर्जदार उमेदवार राजन विचारे व केदार दिघे यांच्या मागणीनुसार ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या Burnt memory/ microcontroller ची तपासणी आणि पडताळणी प्रक्रिया पूर्ण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक :

भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त दि.17 जून 2025 च्या पत्र व त्यासोबतच्या SOP नुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मधील ठाणे जिल्ह्यातील 147-कोपरी पाचपाखाडी व 148-ठाणे या विधानसभा मतदारसंघातील अर्जदार उमेदवार श्री. राजन विचारे व श्री.केदार दिघे यांनी केलेल्या मागणीनुसार केंद्र क्रमांक अनुक्रमे 305 व 68 मधील ईव्हीएम व्हीव्हीपॅटच्या Burnt memory/microcontroller च्या तपासणी व पडताळणीची प्रक्रिया दि.19 जुलै 2025 रोजी केंद्रीय वखार महामंडळ, तुर्भे, नवी मुंबई येथे करण्यात आली आहे.

भारत निवडणूक आयोगाकडील निदेर्शानुसार व विहित कार्यपध्दतीनुसार (SOP) अर्जदार उमेदवार यांनी ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीनच्या Burnt memory/microcontroller तपासणीच्या अनुषंगाने उपलब्ध असलेले 1. Diagnostic Checking व 2. Mock Poll या पयार्यांपैकी Diagnostic Checking करण्याबाबतचा पर्याय निवडला.

भारत निवडणूक आयोग यांच्याकडील कार्यपध्दतीनुसार (SOP) Diagnostic Checking या पयार्यांनुसार अर्जदाराने निवड केलेल्या मतदान केंद्रावरील प्रत्यक्ष वापरण्यात आलेली इव, उव व VVPAT यांची जोडणी करण्यात येते. जोडणी केल्यानंतर ही मशीन Self Diagnostic Check करून त्याबाबत VVPAT मध्ये 7 स्लिप्स प्रिंट होतात. या कार्यवाही दरम्यान अर्जदार उमेदवारास किंवा त्यांच्या प्रतिनिधीस या मशीनमध्ये मतदान केंद्रावरील झालेले केवळ एकूण मतदान दाखविण्यात येते.

भारत निवडणूक आयोग यांच्याकडील कार्यपध्दतीनुसार (SOP) Mock Poll हा पर्याय निवडल्यास अर्जदाराने निवड केलेल्या मतदान केंद्रावरील CU मधील संपूर्ण निकाल अर्जदार उमेदवार/प्रतिनिधी यांना दाखविण्यात येतो. त्याची नोंद विहित नमुन्यात करण्यात येवून त्यावर उपस्थित अर्जदार उमेदवार/प्रतिनिधी यांची स्वाक्षरी घेण्यात येते. त्यानंतर उव मधील संपूर्ण डेटा Erase करण्यात येवून BU, CU व VVPAT यांची जोडणी करण्यात येते. त्यानंतर Mock Poll ची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. या Mock Poll मध्ये किमान 500 मतदान करण्यात येते. त्यानंतर या Mock Poll चा निकाल अर्जदार उमेदवार/प्रतिनिधी यांना पुन्हा दाखविण्यात येतो व त्याची नोंद घेवून उपस्थित अर्जदार उमेदवार/प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरी घेण्यात येतात.

147-कोपरी पाचपाखाडी व 148-ठाणे या विधानसभा मतदारसंघातील अर्जदार उमेदवारांनी Diagnostic Checking हा पर्याय निवडल्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडील विहित कार्यपध्दतीनुसार मशीनमधील एकूण झालेले मतदान दाखविण्यात आले असून ते बरोबर असल्याचे दिसून आले. ही प्रक्रिया भारत निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या भारत ईलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड कंपनीच्या अभियंत्याद्वारे पूर्ण करण्यात आली.

ही तपासणी प्रक्रिया अर्जदार उमेदवार / प्रतिनिधी, जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.अशोक शिनगारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली असून 147-कोपरी पाचपाखाडी व 148-ठाणे या विधानसभा मतदारसंघातील अनुक्रमे मतदान केंद्र क्रमांक 305 व 68 मधील EVM-VVPAT मशीन Diagnostic Tests Pass झाल्या आहेत.

148-ठाणे विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक 68 च्या मतदान केंद्राध्यक्ष यांनी मतदानाच्या दिवशी मतदान संपल्यानंतर VVPAT मधील बॅटरी न काढल्याचे Diagnostic Checking करताना दिसून आले.

उपस्थित अर्जदार उमेदवार / प्रतिनिधी यांच्या शंकाचे निरसन भारत ईलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या नियुक्त अभियंत्यांनी केले असून ही प्रक्रिया समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी सांगितले.

## परिमंडळ 4 उपआयुक्त सचिन गोरे यांचा ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डोंगरे यांनी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले

■ठाणे। प्रतिनिधी,

उल्हासनगर पोलीस उपायुक्त परिमंडल ०४ मध्ये असलेले हजारो प्रलंबित प्रकरणे अवघ्या २७ दिवसात निकाली काढून पोलिसांनी न्याय प्रक्रियेला नवे बळ दिले आहे. उल्हासनगर परिमंडल चार अंतर्गत राबविण्यात आलेले जुने निर्गती विशेष अभियान मोहिमेत ठाणे पोलीस आयुक्तालय मध्ये एक नवा विक्रम प्रस्थापित केले असून या मोहिमेचे यशस्वी नेतृत्व बद्दल परिमंडळ ४चे पोलीस उपयुक्त सचिन गोरे यांचा ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते विशेष सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. ही कामगिरी पोलिसांच्या कार्यक्षमता नियोजन शक्ती आणि जनतेचा न्यायचा आश्वासनाचा



ठोस पुरावा ठरली आहे. दि ४/०६/२०२५ ते ३० जून २०२५ या उद्या 27 दिवसाचा कालावधीत गुन्हेरगती या विशेष महिन्यात अंतर्गत परिमंडल





चार मध्ये एकूण २,०३३ प्रलंबित प्रकरणाची निर्गती करण्यात आली यात १,८०५ विविध गुन्हे, १८० अकस्मात मृत्यू आणि इतर चौकशी प्रकरणे या सर्वांचे समावेश आहे. पोलीस उपयुक्त परिमंडळ०४ त्यांच्या अंतर्गत असलेले उल्हासनगर अंबरनाथ मध्यवर्ती हेडलाईन बदलापूर विठ्ठलवाडी या सर्व पोलीस ठाण्यामध्ये विशेष निर्गती पथकाचे स्थापना करून अत्यंत नियोजिबद्ध आणि कार्यपद्धतीने ही कामगिरी पार पाडण्यात आली. डीसीपी सचिन गोरे यांनी सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अधिकारी आणि कर्मचारी वर्गांना एकत्रित करून नियोजन व मार्गदर्शन त्या जोरावर मोहिमेचे अंमलबजावणी केली.

**-:प्रतिक्रिया :-**

सचिन गोरे (पोलीस उपायुक्त, उल्हासनगर परिमंडळ ४) 'ही प्रशस्ती ही माज्या वैयक्तिक यशाची नाही, तर परिमंडळ ४ मधील प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याच्या आणि कर्मचाऱ्याच्या कठोर मेहनतीचं फळ आहे. 'गुन्हे निर्गती' मोहिमेचा उद्देश केवळ आकडे सुधारणे नव्हता, तर नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे हा होता. ठाणे पोलीस आयुक्तांकडून मिळालेला हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. पुढेही अशाच तडफदार आणि लोकाभिमुख कामगिरीसाठी आम्ही कटीबद्ध आहोत. गुन्हेगारी नियंत्रण आणि न्यायप्रक्रियेला गती देणे हे आमचं सर्वोच्च उद्दिष्ट राहील.'

## अमृता फडणवीसांना पुणे सत्र न्यायालयाची नोटीस



■पुणे । प्रतिनिधी,

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना पुणे सत्र न्यायालयाने नोटीस धाडली असून प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना पुणे सत्र न्यायालयाने नोटीस धाडली असून प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**नेमकं काय आहे प्रकरण?**

एप्रिल २०२५ मध्ये फडणवीस यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह, खोटा आणि बदनामीकारक मजकून पोस्ट करण्यात आला होता. त्याप्रकरणी त्यांनी पुणे सायबर क्राईम पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सातही आरोपींना नोटीस पाठवून अटक केली होती. सध्या या सातपैकी पाच आरोपी पोलिस कोठडीत आहेत, तर दोन आरोपी फरार आहेत. अटकेत असलेल्या आरोपी यांच्याकडून पुण सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर आता पुणे सत्र न्यायालयाने अमृता फडणवीस यांना नोटीस बजावली आहे. या खटल्यामध्ये त्यांचे वैयक्तिक म्हणणे काय आहे, याविषयी स्पष्टीकरण देण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहावे किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. फडणवीस यांनी या प्रकरणात अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, त्यांनी यापूर्वी अनेकदा सोशल मीडियावरून स्वतःविरोधात होणाऱ्या ट्रोलिंगला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे

## ३०० कोटी कर्ज मंजूर करण्यासाठी ६४ कोटींची लाच घेतली; ICICIच्या माजी CEO चंदा कोचर दोषी

■मुंबई । प्रतिनिधी,

आयसीआयसीआय बँकेच्या माजी सीईओ चंदा कोचर यांना भ्रष्टाचार प्रकरणी दोषी ठरवण्यात आलंय. व्हिडीओकॉन कंपनीला ३०० कोटींचं कर्ज मंजूर करण्यासाठी चंदा कोचर यांनी ६४ कोटींची लाच स्वीकारल्याचा आरोप होता. अपीलीय न्यायालयानं त्यांना दोषी ठरवलं आहे. व्हिडीओकॉन कंपनीला ३०० कोटींचं कर्ज दिल्यानंतर त्या बदल्यात ६४ कोटींची रक्कम चंदा कोचर यांच्या पतीच्या कंपनीला देण्यात आली होती. ट्रिब्यूनलनं सुनावणीनंतर निकाल देताना स्पष्ट केलं की लाचेची देवघेव ही स्पष्ट होती. आयसीआयसीआय बँकेनं २७ ऑगस्ट २००९ रोजी व्हिडीओकॉनला ३०० कोटींचं कर्ज दिलं. पुढच्याच दिवशी व्हिडीओकॉनची कंपनी एसपीएलने दीपक कोचर यांची कंपनी न्यूपॉवर रिन्यूएबल्सला ६४ कोटी पाठवले. ट्रिब्यूनलने हा क्विड प्रो क्वो असल्याचं सांगितलं. कर्जाच्या बदल्यात लाच देण्याचा हा प्रकार आहे. चंदा कोचर यांच्यावर बँकेच्या नियमांचं उल्लंघन केल्याचा आरोप आहे. कर्ज





मंजूर करताना त्यांनी पतीचे व्हिडीकॉन कंपनीशी व्यावसायिक संबंध आहेत हे सांगितलं नाही. हितसंबंधाच्या नियमांचं हे उल्लंघन होतं. चंदा कोचर यांना त्यांच्या पतीच्या कामाची माहिती नव्हती असं सांगू शकत नाहीत असंही न्यायालयाने म्हटलं. ईडीने चंदा कोचर आणि त्यांच्या पतीची ७८ कोटींची मालमत्ता जप्त केली होती. ही कारवाई योग्य असल्याचंही ट्रिब्यूनलने म्हटलं. यात मुंबईत चर्चगेटजवळ असलेल्या त्यांच्या फ्लॅटचा समावेश आहे. मात्र १०.५ लाखांची रोकड परत देण्यात आली. कोचर दाम्पत्याने या रकमेबाबत पुरावे दिले होते. सध्या चंदा कोचर आणि दीपक कोचर हे जामीनावर बाहेर आहेत. पण त्यांच्यावर खटला सुरू आहे. कोचर यांनी फसवणूक केल्याचं आणि बँकेला नुकसान पोहोचवल्याचं सिद्ध करण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत. व्हिडीओकॉनला दिलेलं कर्ज नंतर बुडालं आणि यामुळे आयसीआयसीआयला मोठा फटका बसला.

## एक्सप्रेस महिला कोचवर दगडफेक, खिडक्यांच्या काचा फुटल्या



**विरार, वार्ताहर :**

विरार नारंगी आणि वैतरणा या दरम्यान व्हीआर आउटर आणि नारिंगी एलसी दरम्यान जात असताना अज्ञात इसमाने महिला कोचवर दगडफेक केली. या दगडफेकीत खिडकीच्या काचा फुटल्या. दगड थेट खिडकीवर आदळल्याने काही कळायच्या आत खिडकीच्या काचा महिलांच्या अंगावर पडल्या. आज २२ जुलै रोजी, १२९२१ फ्लाइंग राणी ही ट्रेन व्हीआर आउटर आणि नारिंगी एलसी दरम्यान जात असताना, अज्ञात इसमाने एका दगडाने महिला कोचची खिडकीची काच फोडली. ही घटना सायंकाळी साडेसातच्या सुमाराची असल्याची माहिती रेल्वेच्या सूत्रांनी दिली आहे. ही दगडफेक का आणि कोणी केली हे समजू शकले नाही. आरपीएफ पोलीस ठाण्याच्या लँडलाइन वर फोन करून अधिकृत विचारणा केली असता, या फोनवर फोन करू नका असे आरपीएफच्या प्रवीण कुमार या अधिकाऱ्याने सांगितले. मी ऑफीसमध्ये बसलो आहे, ऑफिसमध्ये येऊन बोला, अशी उद्धट उत्तरे त्यांनी दिली. या दगडफेकीच्या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून रेल्वे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली आहे.

## गोहत्या करणारे कत्तलखाने केले उद्ध्वस्त

■बदलापूर। प्रतिनिधी,



बदलापूर येथील बदलापूरगावात गोहत्या होत असल्याच्या आलेल्या तक्रारीवरून कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने पोलीस बंदोबस्तात गोहत्या करणारे कत्तलखाने उध्वस्त केले आहेत. काही राहिलेले कत्तलखाने लवकरच उध्वस्त करण्यात येणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. गोहत्या करणारे कत्तलखाने उध्वस्त करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. अशा अनेक कत्तलखान्यांवर कारवाई करण्यात येईल असे याप्रसंगी सांगण्यात आले.

## ऑनलाइन गेमच्या विळख्यात अडकलेल्या दोघांची आत्महत्या

### आजची तरुण पिढी ऑनलाइन गेमच्या आहारी

■पारनेर (जि. अहिल्यानगर)। प्रतिनिधी,

पारनेर तालुक्यातील एका तरुणाने ऑनलाइन गेमच्या विळख्या अडकल्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत पोलिसांत अधिकृत काहीही नोंद नाही. त्याच्या मित्रानेही ऑनलाइन गेममुळे आत्महत्या केल्याची चर्चा आहे. सदर तरुण हा बारावी उत्तीर्ण झाला होता. तो अहिल्यानगर शहरात मित्रांसोबत खोलीवर राहत होता. मित्रांबरोबर राहून शिक्षण घेत असताना तो ऑनलाइन गेमच्या जाळ्यात फसला. आपले शिक्षण पूर्ण करून गावाकडे आला असतानाही ऑनलाइन गेम त्याचा पिच्छा सोडायला तयार नव्हता. चार दिवसांपूर्वी घरातील आई-वडिलांसह इतर सदस्य शेती कामासाठी गेले असताना घरी गळफास घेतला. या तरुणाच्या आणखी एका मित्रानेही काही दिवसांपूर्वी आत्महत्या केल्याची चर्चा आहे. मात्र, पालकांनी याबाबत पोलिसांत काहीही माहिती दिलेली नसल्याने अधिकृतपणे यावर कुणीही शिक्कामोर्तब केले नाही.



**खामगाव (जि. बुलढाणा) :** राज्यातील युवकांचे वर्तन दिवसेंदिवस अधिकच बिघडत असल्याचे चिंताजनक वास्तव पोलिसांच्या आकडेवारीतून समोर आले आहे. गेल्या १५ दिवसांत राज्यात कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या ५,२०८ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यात १८ ते ३५ वयोगटातील ३,५७३ युवकांचा समावेश आहे. ही आकडेवारी चिंता वाढवणारी आहे. राज्यातील विविध पोलिस विभागांकडून अमली पदार्थांचे सेवन, बेकायदेशीर जमावबंदीचे उल्लंघन, आदी प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, १८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढताना दिसत असून, काही प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुलांचाही सहभाग असल्याचे उघड झाले आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# वादळी सुरुवात

सदेच्या पावसाळी अधिवेशनाची सुरुवात अपेक्षेनुसार वादळी स्वरूपात झाली आहे. पहलगामची घटना, त्यानंतर झालेल्या ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर झालेला सीझ फायरचा एपिसोड, डोनाल्ड ट्रम्प यांची एकामागून एक भारतविरोधी वक्तव्ये या सगळ्या पार्श्वभूमीवर संसद अधिवेशनात गोंधळ अपेक्षितच होता. त्याची चुणूक आज पहिल्या दिवशीच दिसली आहे. मुळात वरील सगळ्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन घ्यावे, अशी मागणी विरोधी पक्षांनी सातत्याने केली होती, पण त्या मागणीला सरकारने धूप घातली नाही. पुढील महिन्या दीड महिन्यात संसदेचे पावसाळी अधिवेशन होईल त्यात यावर चर्चा होऊ शकते असे सांगत सरकारने ते विशेष अधिवेशन घेण्याचे टाळले.आणि आजपासून पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यानंतर निदान पहिला मुद्दा हा पहलगाम घटना आणि ऑपरेशन सिंदूर यावर केंद्रित असायला हवा होता, पण संसदेच्या दोन्ही सभागृहात त्यावर आज पहिल्या दिवशी तरी चर्चा होऊ दिली गेली नाही. त्यामुळे दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष सदस्यांनी एकत्रितपणे सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले आहे.या गडबडीत राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेता या नात्याने संसदेत काही मुद्दा मांडायचा होता; पण त्यांनाही बोलू दिले गेले नाही, असा त्यांचा आक्षेप होता. लोकसभेतला विरोधी पक्षनेता या नात्याने आपले मत मांडणे हा आपला लोकशाहीचा अधिकारसुद्धा सरकार मानत नाही ही नवीन कामकाज पद्धती आहे, अशी टिप्पणी राहुल गांधी यांनी केली आहे. मुळात आज मोदींची अत्यल्प उपस्थिती हाही एक चचेर्चा मुद्दा ठरला. लोकसभेत सुरुवातीला पहलगाम हल्ल्यातील मृतांना तसेच दिवंगत संसद सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यापुरते मोदी लोकसभेत उपस्थित होते आणि त्यानंतर लगेच ते तिथून रवाना झाले. आज दिवसभराच्या घडामोडीनंतर सरकारकडून अशी घोषणा करण्यात आली आहे की पहलगामची घटना आणि ऑपरेशन सिंदूर याविषयी लोकसभेत सोळा तास आणि राज्यसभेत नऊ तास विशेष चर्चा घडवून आणली जाणार आहे. पण या चचेर्ची नेमकी तारीख आणि कोणत्या कलमाखाली ही चर्चा होणार आहे हे सरकारने जाहीर केलेले नाही.या चर्चेविषयी सरकार जर गंभीर असेल तर या चर्चेच्या काळात खुद्द पंतप्रधान मोदी संसदेत उपस्थित राहायला हवेत, अशी मागणी समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केली आहे. त्यांनी ही मागणी करण्याचे कारण असे की, पंतप्रधान मोदी 23 तारखेला ब्रिटन आणि मालदीवच्या दौयावर जाणार आहेत. मोदी विदेश दौयावर असतानाच ही चर्चा उरकून घेण्याचा सरकारचा इरादा आहे काय, असा एक सवाल आता उपस्थित केला जात आहे. खरं म्हणजे हा जो सगळा घटनाक्रम झाला, त्याची बर्यापैकी माहिती लोकांना विदेशी मीडियातून आणि विदेशातील नेत्यांनी केलेल्या वक्तव्यातून मिळालेली आहे. भारतातल्याही विरोधी पक्षनेत्यांनी त्यावर पुरेसे भाष्य केले आहे, त्यामुळे संसदेत होर्णाया चचेर्ला उपस्थित राहणे मोदींनी टाळायचे काही कारण नाही. आपल्या उपस्थितीत ही चर्चा झाली तर विरोधी पक्षांचे नेमके म्हणणे काय आहे हे पंतप्रधानांना ऑन रेकॉर्ड ऐकता येईल.पण त्यासाठी त्यांनी सभागृहात उपस्थित राहणे अपेक्षित आहे. अखिलेश यादव म्हणतात त्यानुसार पंतप्रधानांच्या विदेश दौयाच्या कालावधीतच संसदेत ही चर्चा उरकून घेतली जाणार असेल तर या चचेर्बाबत सरकार गंभीर नाही असेच म्हणावे लागेल. आज पहिल्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहात इंडिया आघाडीतील एकजूट भक्कमपणे पाहायला मिळाली. संसद अधिवेशन सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी आघाडीमध्ये मतभेद असल्याच्या बातम्या टीव्ही मीडियातून दिल्या जात होत्या; पण त्यात तथ्य नसल्याचे आज विरोधी पक्षांच्या एकजुटीतून स्पष्ट दिसून आले.विरोधकांचा हा सारा रागरंग बहुदा सरकारच्याही लक्षात आला असावा म्हणूनच आज संसद अधिवेशन सुरू होण्याच्या आधी मोदी यांनी प्रसारमाध्यमांना उद्देशून जे संबोधन केले त्यात त्यांनी विरोधकांना गोंजारण्याचाही प्रयत्न केला. पहलगाम हत्याकांडानंतर विरोधकांच्या समावेशासह संसद सदस्यांचे जे शिष्टमंडळ जगभरात पाठवले गेले तेथे त्यांनी भारताचा आवाज समर्थपणे व्यक्त केला आणि पाकिस्तानचा डाव उघडा पडला हीच एकजूट आपल्याला अपेक्षित आहे, असे नमूद करीत त्यांनी विरोधकांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्याचा विरोधकांवर काही परिणाम झालेला दिसला नाही.लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास रद्द करून पहलगामवर चर्चा करण्याची मागणी केली गेली, पण सभापती ओम बिर्ला यांनी ती अमान्य केली. वास्तविक विषयाचे गांभीर्य लक्षात घेता प्रश्नोत्तराचा तास रद्द करणे आणि महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करायला अनुमती देणे हे काही अवघड नव्हते, पण सरकारने आज निदान पहिल्या दिवशी तरी ही चर्चा टाळली. आता उद्याही पुन्हा हाच गदारोळ चालू राहण्याची शक्यता आहे कारण सरकारने यावर चचेर्साठी वेळ जाहीर केला असला, तरी चर्चा नेमकी कधी केली जाणार हे जाहीर केलेले नाही. त्यामुळे सरकारला पुन्हा संघटित विरोधकांचा सामना करण्याखेरीज गत्यंतर नाही. सरकार चचेर्साठी तयार आहे, सर्व प्रश्नांना उत्तरे दिली जातील असे सरकारकडून वारंवार सांगितले जात असतानाही विरोधकांकडून असा आततायीपणा का केला जातो, असा प्रश्न कोणाच्याही मनात उपस्थित होऊ शकतो, पण विषय असा आहे की पहलगामचे हत्याकांड हा इतका गंभीर मुद्दा असताना तो विषय आधी चचेर्ला घेण्यास सरकारला अडचण काय आहे, हेही स्पष्ट व्हायला हवे.

# शिक्षण व्यवस्थेवर आणखी एक डाग!

शिक्षण क्षेत्राकडे गांभीयार्ने पाहण्याची कोणाची प्रामाणिक मानसिकता नाही की इच्छाशक्ती नाही. केवळ पैसा मिळतो म्हणून शाळा काढण्याचा धंदा जोमात, तर शिक्षण व्यवस्था कोमात अशी परिस्थिती आहे. शहापूर प्रकरणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा शिक्षण व्यवस्थेवर आणखी एक डाग लागला आहे आणि एकूणच व्यवस्थेची, शासन प्रशासनाची प्रतिमा डागाळली गेली आहे. आजची शिक्षणाची अवस्था पाहता सरकारी शाळांबरोबरच खासगी शाळा, संस्थादेखील महत्त्वाच्या आहेत. किमान भविष्यात तरी शिक्षण व्यवस्थेची प्रतिमा अधिक डागाळू नये आणि शिक्षण क्षेत्राला पवित्र विद्यादानाचे वैभव प्राप्त व्हावे. शिक्षण व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली जात असताना आणि एकूणच शिक्षणाचा झालेला बट्ट्यबोळ, खेळखंडोबा यामुळे शिक्षण व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. दररोज शिक्षण क्षेत्रात काही ना काही वादग्रस्त घडते आणि शिक्षणाचे विदारक वास्तव समाजासमोर येते. त्रिभाषा सूत्राचा अट्टहास आणि हिंदी भाषा सक्तीचा मुद्दा राजकीय हेतूने रेटून नेण्याच्या प्रयत्नाने राज्यातील वातावरण ढवळून निघाले असतानाच कुठे मुंबईतील एका शाळेतील शिक्षिकेनेच लहान विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली, तर पनवेलमध्ये एका शाळेतील लहान मुलांना जेवणाची ताटे धुवायला लावली गेली. नुकतेच शहापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी काय कसरत करावी लागते याचे वास्तव समोर आले. हीच परिस्थिती राज्यातील अनेक ग्रामीण भागांत आहे, तर परभणी तालुक्यातील एका शाळेच्या पैशाच्या हव्यासापोटी एका विद्यार्थ्याच्या पालकांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आणि त्या विद्यार्थ्यार्चे भविष्य तसेच कुटुंब उद्धवस्त झाले. अकरावी प्रवेशाचा गोंधळात गोंधळ सुरूच आहे. अवाजवी फीवाढ दरवर्षी केली जाते. त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. खासगी शाळांमध्ये शिक्षकांना अक्षरशः बेठबिगारासारखे कमी वेतनावर राबवून घेतले जाते, तेदेखील खासगी पंत्राटी पद्धतीने. शिक्षकांनाच त्यांचे भवितव्य नाही. नोकरी कधी जाईल याची शाश्वती नाही. अशा वेळी ते विद्यार्थ्यार्चे भविष्य कसे घडवतील? बोगस शाळा, बोगस शिक्षक भरती, शिक्षण क्षेत्रात खालपासून वरपर्यंत बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे एकूणच शिक्षणाची परिस्थिती अवघड आहे. काही दिवसांपूर्वी शहापूर येथील एका खासगी शाळेत तर अतिशय संतापजनक प्रकार घडला. शाळेतील स्वच्छतागृहात रक्ताचे डाग आढळून आले ही बाब मुख्याध्यापकांच्या नजरेत आणली गेली तेव्हा मुख्याध्यापिका बाईंनी याबाबत कुठलाही सारासार विचार, विवेकाचा वापर न करता हाताखाली कर्मचारी, शिक्षक यांना शाळेतील सर्व विद्यार्थिनींची अंतर्वस्त्र काढून तपासणी करण्याचे आदेश दिले आणि त्याप्रमाणे तपासणी केली. मात्र या अनपेक्षित प्रकाराने मुली भेदरल्या. त्यामुळे ही बाब पालकांपर्यंत पोहोचली. पालकांचा संताप अनावर झाल्याने हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले आणि मुख्याध्यापिकेसह आठ जणांवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला गेला. वास्तविक हे प्रकरण मुख्याध्यापिका, शाळा यांना इतर मार्गांनी व्यवस्थितपणे हाताळता आले असते. बाब तशी छोटीशी होती. मुलींकडे चौकशी झाल्यानंतर ते स्वच्छतागृह स्वच्छ धुऊन घेतले असते तर प्रकरण तिथेच थांबले असते. मात्र स्वच्छतेसाठी पाणीदेखील नसल्याची माहिती आहे. कालांतराने पॅरेंट मीटिंग घेऊन पालकांशी याबाबत चर्चा करून विद्यार्थिनीचे समुपदेशन करता आले असते आणि झालेला प्रकार टळला असता. ज्या पद्धतीने तपासणी केली गेली त्याचे समर्थन होऊच शकत नाही. मासिक पाळी येणे ही नैसर्गिक बाब आहे आणि ती टाळताही येत नाही याची जाणीव मुख्याध्यापिका बाईंनी ठेवून हे प्रकरण हाताळायला हवे होते. मात्र तसे झाले नाही. यावरून मासिक पाळीबाबत समाजात जागृती होण्याची किती गरज आहे हे अधोरेखित झाले. या सगळ्या प्रकरणातून काय निष्पन्न झाले, तर शाळेतील विद्यार्थी - विद्यार्थिनींवर याचा विपरीत परिणाम झाला.

मुख्याध्यापिका बडतर्फ झाल्या. आपल्या पाल्याच्या पुढील शिक्षणाचे काय? याविषयी पालकांची चिंता वाढली. शाळा कशी चालू करायची? असा प्रश्न व्यवस्थापनापुढे उभा ठाकला. केवळ एका रक्ताच्या ह्यडागाह्नने शाळेची प्रतिमा तर डागाळली. त्याचबरोबर एकूणच शिक्षण व्यवस्थेवर आणखी एक डाग पडला. म्हणूनच सरकारला याची गंभीरपणे दखल घ्यावी लागली. शिक्षण क्षेत्राला आलेले बाजारीकरणाचे स्वरूप आणि शिक्षण क्षेत्रात पैसा कमावण्याची चांगली संधी व चराऊ कुरण आहे हे लक्षात आल्याने शिक्षण हे देशाची पुढची पिढी घडविण्याचे क्षेत्र नाही, तर पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे. शिक्षणाच्या नावाखाली या धंद्याचा सुळसुळाट झाला आहे. याचे हे दुष्परिणाम अशा स्वरूपात दिसतात. आजकाल तर मोठे उद्योगपती, राजकारणी हे शिक्षणाचा बाजार मांडून पैसा कमावत आहेत. म्हणूनच आजच्या काळात शिक्षण महर्षींची जागा शिक्षणसम्राटांनी घेतली आहे. शहापूरमधील झालेला प्रकारदेखील खासगी शाळेतील आहे आणि तेथे हजारो, लाखो रुपये फी आकारली जाते. मग साध्या पाण्याची व्यवस्था शाळेत असू नये? शाळा व्यवस्थापन, संचालक, मुख्याध्यापिका यांची ही जबाबदारी होती.

# बारामती एकदा बघायलाच हवी... अजितदादा ३५ वर्षांपासून प्रचंड बहुमताने का निवडून येतात याचं उत्तर मिळतं!



बारामती... या नावाची चर्चा केवळ राज्यच नव्हे तर देशपातळीवर होते. विकासाचे मॉडेल म्हणून वारंवार विविध मान्यवरांनी बारामतीचा गौरव केलेला आहे. सर्वांगसुंदर शहर म्हणून बारामतीची ख्याती आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून गेल्या ३५ वर्षांत बारामतीचा सर्वांगीण विकास झाला. निवडणुकीमध्ये अजित पवार लाखांच्या मताधिक्याने का निवडून येतात, कोणत्याही लाटा आल्या गेल्या तरी बारामतीकर अजित पवार यांच्यावरच का विश्वास दाखवतो, सर्वांगीण विकास म्हणजे काय असतो हे पाहायचे असेल तर राज्यातील प्रत्येकाने वेळ मिळेल तेव्हा आवर्जून बारामती बघायला यायला हवे. सातत्याने जी बारामती चर्चेत असते, ती नेमकी आहे तरी कशी, काय आहे या बारामतीत जेथे देशाच्या पंतप्रधानांपासून ते आमदारांपर्यंत सगळ्यांनाच यावेसे वाटते, राजकीय पंढरी म्हणून नावलौकिक प्राप्त ही बारामती नक्की पाहायला हवीच अशी आहे. सर्वांगसुंदर शहर, हरित व स्मार्ट शहर म्हणून बारामती आज राज्यात अग्रेसर आहे. सामाजिक सुरक्षितता, सोयीसुविधा, संतुलित पर्यावरण, हरित व स्वच्छ सुंदर टुमदार शहर पाहायचे असेल तर आवर्जून एकदा तरी बारामती बघायला यायला हवे. बारामती पाहिल्यानंतर कायमचेच इथे स्थायिक होण्याचा तुम्ही नक्की विचार कराल, यात शंका नाही.

### पोलिसांची सोय नव्या प्रशस्त कार्यालयात :

राज्यातील इतर शहरांप्रमाणेच बारामतीतील पोलिस कार्यालय जुन्याच इमारतीतून कामकाज करत होते. अजित पवार यांनी पुढाकार घेत सुरवातीला बारामती तालुका व त्या नंतर बारामती शहर पोलिस ठाण्यासाठी सुसज्ज इमारतींची उभारणी केली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक कार्यालय,वाहतूक पोलिसांचे कार्यालय या इमारती ख-या अथार्ने कापोरेट स्टाईलच्या बनविण्यात आल्या आहेत. परदेशाप्रमाणे बारामतीत पोलिसांना कामासाठी वातावरण तयार करुन देण्यासाठी अजित पवार यांनी पुढाकार घेतला आहे. कामाच्या ठिकाणचे वातावरण चांगले असेल तर कार्यक्षमता वाढते या नियमानुसार बारामतीत जवळपास सर्वच शासकीय कार्यालय ही एखादया खाजगी कंपनीच्या कार्यालयांप्रमाणे करण्यात आली आहेत.

### प्रशासकीय भवनामुळे बारामतीकरांची सोय :

शहरातील प्रशासकीय भवनाच्या उभारणीनंतर तर बारामतीकरांची खूप मोठी सोय झाली. जवळपास ३४ विविध विभागांची कार्यालय एकाच इमारतीत तयार झाल्यामुळे वेळ, श्रम व पैसा या तिन्हींची बचत झाली. सुंदर लँडस्केपिंग, झाडे, प्रशस्त पार्किंग,हवा खेळती राहील व सूर्यप्रकाश छान येईल अशी इमारतीची रचना झाल्यामुळे ही इमारत देखील परिपूर्ण ठरली. एकाच ठिकाणी विविध शासकीय कार्यालयांना आणण्याचा अजित पवारांचा निर्णय योग्य ठरला. लोकांना ते सोयीस्कर झाले आहे.

### क्लॉक टॉवर व जॉगिंग ट्रॅक :

बारामतीतील तीन हत्ती चौकामध्ये उभारलेले क्लॉक टॉवर लंडनच्या धर्तीवर आहे. अतिशय सुंदर रचना असून रात्रीच्या वेळेस दिव्यांच्या उजेडामुळे हा टॉवर उजळून निघतो. या नजिक नागरिकांना विसावा घेण्यासाठी आणि जॉगिंगसाठी केलेला ट्रॅक पाहण्यासारखा. बारामतीत याल तेव्हा आवर्जून या बाबी पाहायला हव्यात. नटराज नाट्य कला मंडळाची देखणी वास्तू व नजिक असलेले क्लॉक टॉवर या मुळे बारामतीच्या वैभवात भर पडली आहे. आता त्या नजिकच बारामतीतील सर्वात उंच राष्ट्रध्वज उभारला जात आहे.

### भिगवण रस्त्याचे पालटले रूप :

राज्याच्या कानाकोप-यातून तुम्ही जेव्हा बारामतीला याल, तेव्हा तीन हत्ती चौक ते पेन्सिल चौकापर्यंतचा भिगवण रस्ता आवर्जून बघा. या रस्त्याच्या दुतर्फा अजित पवार यांनी पुढाकार घेत जे सुशोभिकरण केलेले आहे, ते परदेशाच्या धर्तीवर आहे. तुम्ही पहाटे किंवा संध्याकाळी जेव्हा या रस्त्यावरुन जाल, तेव्हा असंख्य बारामतीकर या रस्त्याच्या बाजूने केलेल्या पदपथावरुन जॉगिंग रनिंग करताना दिसतील. या ठिकाणी बसण्यासाठी जी सुंदर व्यवस्था केली आहे, तेथे बसून चार क्षण निवांतपणे बसलेले लोक दिसतील. बाजूला जी खेळणी आहेत, त्यावर लहान थोर खेळण्यांचा आनंद घेताना तर बाजूला असलेल्या ओपन जिमवर काही जण व्यायाम करताना दिसतील.

### गर परिषदेची अत्याधुनिक इमारत

बारामती नगरपरिषदेला वैभवशाली परंपरा आहे. स्वातंत्र्यापूर्वी सन 1865 मध्ये स्थापना झालेल्या नगरपरिषदेने 160 वर्षांच्या इतिहासात अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. अनेक ऐतिहासिक घटनांची साक्षीदार असलेली बारामती नगरपरिषद अजित पवार यांच्या पुढाकारातून प्रशस्त व अत्याधुनिक वास्तूमध्ये कामकाज करत आहे. मिटींग हॉल,उत्तम इंटेरिअर, प्रशस्त व पुरेशी जागा, चांगले पार्किंग या सुविधांमुळे बारामती नगरपरिषदेच्या इमारतीत आल्यानंतर नागरिकांनाही वेगळे समाधान मिळते.

भव्य पोलिस उपमुख्यालय साकारले :

बारामती तालुक्यातील ब-हाणपूर येथे उभारलेले पोलिस उपमुख्यालय पाहिल्यावर आपण परदेशात असल्याचाच भास होतो, इतक्या सुंदर इमारती येथे साकारण्यात आल्या आहेत. राज्यातीलच नव्हे तर देशातील सर्वांगसुंदर असे उपमुख्यालय बारामती भेटीदरम्यान आवर्जून पाहण्यासाठी जायला हवे असेच आहे. अजित पवार यांची दृष्टी व त्यांचे व्हिजन यातून सहजतेने समजते.

### बारामतीचे सर्वांगसुंदर बसस्थानक :

राज्यातील सर्वात भव्य व सुंदर विमानतळाच्या धर्तीवरील बसस्थानक बारामतीत अजित पवार यांच्या पुढाकारातून अवघ्या दोन वर्षात साकारले आहे. प्रशस्त इमारत, उत्तम व्यापारी संकुल, बसेस उभारण्यासाठीची जागा, प्रवाशांसह कर्मचारी अधिकारी यांच्यासाठी अत्यंत प्रशस्त,अत्याधुनिक इमारत उभारण्यात आली आहे.

### श्रीमंत बाबूजी नाईकवाडा खुलविणार बारामतीचे सौंदर्य

पेशव्यांचे सावकार असलेल्या श्रीमंत बाबूजी नाईक यांचा वाडा हे बारामतीचे वैभव आहे. इतिहासाच्या खुणा सांगणारी व त्या काळातील थोर व्यक्तींच्या जीवनप्रवासाची साक्षीदार असलेली ही वास्तू आता अत्यंत सुंदर व देखणी झाली आहे. या वाडयातील पोलिस ठाण्यासह सर्वच शासकीय कार्यालय वाडयाबाहेर काढून अजित पवार यांनी या वास्तूचे जतन करण्याचा निर्णय घेतला. बारामतीचा इतिहास या वाडयातून बाहेरगावाहून येणा-यांसमोर दृकश्राव्य पध्दतीने सांगितला जाणार आहे. अँम्फी थिएटरच्या माध्यमातून कार्यक्रमांचे सादरीकरण होईल. तटबंदीवरुन चालत पूर्ण किल्ला फिरता येणार आहे. क-हा नदीचे विहंगम दृश्य या तटबंदीवर उभे राहून अनुभवता येईल. अजित पवार यांच्या ड्रीम प्रोजेक्टपैकी हा एक आहे.

### कण्हेरी वनउद्यानामुळे निसगार्चा आनंद घेता येईल :

बारामतीशहरानजीक कण्हेरी येथील वनविभागाच्या क्षेत्रामध्ये बारामतीकरांना निसर्गवाचन करता येईल, पक्षी झाडे व या परिसरातील प्राणी पाहता यावेत,या उद्देशाने कण्हेरी वनउद्यानाची निर्मिती अजित पवार यांनी केली आहे. पर्यटन व जोडीला निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ व्यतित करता येईल. शहराच्या जवळ पण तरीही निसर्गाच्या सान्निध्यातील ही जागा प्रत्येकाला आवडेल अशीच आहे. नैसर्गिक पाण्याचे तळे व विकसीत केल्या काही गोष्टी आवर्जून पाहण्यासारख्या आहेत.

### पंचायत समितीची देखणी इमारत :

सुंदर रंगसंगती, आकर्षक इमारतीचे डिझाईन, प्रकाश येण्यासाठी केलेली डोमची रचना, हवा खेळती राहील व दिव्यांचा वापर किमान व्हावा याची घेतलेली काळजी, व्यवस्थित पार्किंगची सुविधा, कापोरेट स्तराचे फर्निचर, उत्तम मिटींग हॉल,प्रत्येक कर्मचारी व अधिकारी यांची बैठक व्यवस्था या सर्वच बाबी पाहण्यासारख्या आहेत. राज्यात पंचायत समितीची अशी इमारत क्वचितच इतर ठिकाणी असू शकेल.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैदयकीय महाविद्यालय :

राज्यातील सुसज्ज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैदयकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय ही इमारत राज्यातील प्रत्येकाने एकदा येऊन पाहायलाच हवी. शासकीय रुग्णालय इतके सुसज्ज, देखणे, नीटनेटके,स्वच्छ असू शकते याचा विश्वास बसणार नाही. अकरा ऑपरेशन थिएटर, सिटी स्कॅन,एमआरआयची सुविधा, शवविच्छेदन, अतिदक्षता विभाग,तातडीच्या उपचारांची सुविधा अशा आरोग्यविषयक सर्वच बाबी शासकीय दरामध्ये रुग्णांना उपलब्ध होण्यासाठी अजित पवार यांनी या प्रकल्प बारामतीत साकारला आहे. सिंगापूरच्या धर्तीवर बारामतीच्या या शासकीय रुग्णालयाची इमारत साकारली आहे. बारामतीत कधी याल तर ही इमारत आवर्जून बघायला जायला हवेच. शासकीय रुग्णालय असावे तर बारामतीसारखे असेच प्रत्येक बाहेरगावचा माणूस बोलून दाखवतो.

### नीरा डावा कालव्याचे सुशोभिकरण :

इंग्रजांनी दुष्काळाच्या काळात हाताला काम मिळावे या उद्देशाने नीरा डावा कालव्याची निर्मिती केली. हा कालवा बारामती तालुक्यातील असंख्य शेतक-यांसाठी वरदान आहे. बारामती शहरातून वाहणा-या नीरा डावा कालव्याची अवस्था दयनीय होती. अजित पवार यांनी या कालव्याचे लायनिंग करत दोन्ही बाजूला अत्यंत सुंदर सुशोभिकरण करत त्याचा कायापालट करुन टाकला. परदेशातील कालव्यांच्या बाजूने जसे वातावरण असते तसेच बारामतीत तुम्ही तीन हत्ती चौक, परकाळे बंगला पूल किंवा देवीच्या देवळानजिकच्या पूलावर गेल्यावर जाणवेल. बारामतीत याल तेव्हा तीन हत्ती चौकातील वॉल क्लॉक टॉवरपासून चालत देवीच्या मंदीरापर्यंत कालव्याच्या कडेने नक्की जा.

### नागरिकांच्या विसाव्यासाठी जागा :

लोकांना उच्च दजार्चे राहणीमान मिळावे, घरातून बाहेर पडल्यानंतरही त्यांना चार क्षण विरंगुळा मिळावा, आप्तस्वकीयांसह मित्रमंडळीसोंबत निवांतपणे बसून सुख दुःखाच्या चार गोष्टी करता याव्यात, हितगुज करता यावे, या उद्देशाने भिगवण रस्ता, साठवण तलावाच्या बाजूला, गरुडबाग, नीरा डावा कालव्याच्या दोन्हीबाजूला, देवीच्या देवळानजिक अशा अनेक ठिकाणी जाणीवपूर्वक अशा जागा विकसीत करण्यात आल्या आहेत. बारामतीकर त्याचा आनंद घेतात.

### भव्य ग्रंथालयाची बारामतीत निर्मिती :

बारामती शहर पोलिस ठाण्याच्या बाजूला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र व त्याच्यासोबतच अत्याधुनिक व सुसज्ज ग्रंथालयाची उभारणी अजित पवार यांच्या पुढाकारातून झाली आहे. एकीकडे वाचन संस्कृती लोप पावत चालली असताना या चळवळीला चालना देण्याच्या उद्देशाने पवार यांनी राज्यातील सर्वांगसुंदर ग्रंथालय बारामतीत उभारलेले आहे. ज्यांना वाचनाची आवड आहे, त्यांच्यासाठी हे ग्रंथालय ही पर्वणी ठरणार आहे. ही इमारत आवर्जून पाहण्याजोगी आहे. पारंपरिक व अत्याधुनिक वाचन प्रणाली असा दोन्हीचा संगम या ठिकाणी करण्याचा प्रयत्न होणार आहे.

### भव्य आयुर्वेदिक महाविद्यालयाची उभारणी :

एखादा प्रकल्प हातात घेतल्यापासून ते त्याची प्रत्यक्ष उभारणी किती जलदगतीने व सुंदर रितीने होते,याचे बारामतीत उभारण्यात आलेले आयुर्वेदिक महाविद्यालय हे उदाहरण आहे. जागा निश्चितीपासून ते आता थेट या इमारतीत कामकाज सुरु होण्यापर्यंतचा प्रवास अतिशय अल्प कालावधीचा आहे, पण पुण्याहून बारामतीत प्रवेश करताना बारामतीच्या प्रवेशद्वारानजिकच या भव्य इमारती आपले लक्ष वेधून घेतात. विद्यार्थ्यांना उत्तम इन्फ्रास्ट्रक्चर दिल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा अनुकूल परिणाम होतो ही बाब विचारात घेत त्यांना जागतिक दजार्चे इन्फ्रास्ट्रक्चर अजित पवार यांनी उपलब्ध करुन दिलेले आहे.

### उत्तम रस्त्यांचे निर्माण केले जाळे :

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग, जेजुरी ते बारामती हायब्रीड अँन्युटी प्रकल्प, बारामती भिगवण व बारामती फलटण रस्ताचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, बारामती नीरा रस्त्याचे विस्तारीकरण, बारामती ते उंडवडीपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण, नव्याने विकसीत केला जात असलेल्या आयुवेर्दीक महाविद्यालय ते बारामती एमआयडीसी पर्यंतचा रस्ता, नवीन रिंग रोड या सारख्या रस्त्यांच्या निर्मितीमुळे बारामतीचा विकास अधिक वेगाने होण्यास मदत होत आहे. रस्ता तयार करण्याबाबत अजित पवार कायमच आग्रही असतात. विकासासाठी रस्त्यांचे जाळे मजबूत असायला हवे, यावर त्यांचा विश्वास आहे. बारामतीसाठी तुम्ही कोणत्याही भागातून आल्यास रस्त्यांचा दर्जा तुम्हाला बरच काही सांगून जातो. राजकीय इच्छाशक्ती असेल तर काय परिवर्तन होऊ शकते हे बघायला बारामतीत यायला हवे.

### बारामती-फलटण रेल्वेमागार्चे काम मार्गी :

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले बारामती फलटण रेल्वेमार्गाच्या भूसंपादनाचे महत्वाचे काम अजित पवार यांनी मार्गी लावले. डॉ. राजेश देशमुख पुण्याचे जिल्हाधिकारी असताना त्यांनी हे काम पूर्णत्वास नेले. त्यांच्या प्रयत्नांमुळे भूसंपादनाचे सगळ्यात अवघड काम मार्गी लागले. आज या रेल्वेमागार्चे प्रत्यक्षात काम सुरु झाले आहे. येत्या दोन वर्षात हे काम पूर्णत्वास जाईल आणि बारामती फलटण लोणंद मिरजमार्गे दक्षिण भारतात जाता येईल. रेल्वेच्या नकाशावर बारामती महत्वाचे रेल्वेस्थानक म्हणून उदयास येईल.

### शेतकऱ्यांच्या शिवारात एआय तंत्रज्ञान येणार :

इतर बाबींप्रमाणेच बारामती कृत्रीम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात देशाच्या नकाशावर येणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार व सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी अँग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या माध्यमातून विविध पिकांबाबतचे एआय तंत्रज्ञान शेतक-यांच्या शिवारापर्यंत पोहोचविण्याची चळवळ उभारली आहे. याला अजित पवार यांनी शासनस्तरावर मदतीचा हात पुढे केला असून यंदाच्या अर्थसंकल्पात पाचशे कोटींची तरतूद या साठी करण्यात आली आहे. हे तंत्रज्ञान पाहण्यासाठी आवर्जून बारामतीला यायला हवे. कमी खर्चात अधिक उत्पन्न व उत्पादन देणारी उसशेती बारामतीत पाहायला मिळेल.

### कऱ्हा नदीचे झाले सुशोभीकरण :

शहरातून वाहणाऱ्या कऱ्हा नदीचे सुशोभीकरण ही अशक्यप्राय वाटणारी बाब होती. अजित पवार यांनी मनावर घेतले आणि कामाला सुरवात झाली. बघता बघता या नदीचा परिसर बदलून गेला. क-हा नदीच्या पात्रात जॉगिंग व चांगली झाडे येतील असे कोणालाही वाटले नव्हते, आज या क-हा नदी पात्राच्या सुशोभिकरणाचे काम प्रगतीपथावर असून अनेक ठिकाणची परिस्थिती बदलली असून हा परिसर हळुहळू रमणीय होऊ लागला आहे. नदीपात्रात सोडले जाणारे सांडपाणी रोखण्यासाठी उपाययोजना केल्या असून त्यालाही यश येत आहे. राज्यातील अनेक शहरात जेथे नदीपात्र आहे, तेथे नदीपात्रामध्ये काय परिवर्तन होऊ शकते हे बारामतीत येऊन पाहण्यासारखे आहे. हे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

### शहराचे बदलले रूप :

शहर स्वच्छ, सुंदर व हरित असावे असा आग्रह लोकप्रतिनिधीने धरला आणि त्यासाठी इच्छाशक्ती दाखवित काम सुरु केले तर शहराचे रुप कसे आमूलाग्र बदलू शकते हे बारामतीने दाखवून दिले आहे. अजित पवार यांनी विविध स्तरावर शहर विकासासाठी अनेक योजना आखल्या आणि त्या पूर्णत्वास नेल्या. पर्यावरणाचा समतोल कायम राहावा या साठी त्यांनी वृक्षारोपणावर मोठा भर दिला. बारामतीत आला तर तुम्हाला झाडांची संख्या व हिरवागार परिसर जाणवेल. प्रत्येक भागात विकसीत केलेली छोटी उद्याने त्या भागातील नागरिकांसाठी महत्वाची ठरतात. नागरिकांना नजरेसमोर ठेवून शहर अधिक चांगले व्हावे या साठी त्यांचा सातत्याने प्रयत्न सुरु असून राज्यातील इतर शहरांच्या तुलनेत बारामती नक्कीच उजवे शहर आहे यात शंका नाही.

### बारामतीत साकारणार पशुवैद्यकीय महाविद्यालय :

गेल्या काही वर्षात बारामतीला मिळणा-या शिक्षणाच्या विविध सुविधांमुळे बारामतीची ओळख एज्युकेशन हब म्हणून होऊ लागली आहे. कृषीप्रधान संस्कृती असलेल्या या परिसरामध्ये इतर शिक्षणासोबतच पशुवैदयकीय महाविद्यालयाची गरज होती. अनेक वर्षांपासून त्याची मागणी होती. ही बाब विचारात घेत अजित पवार यांनी बारामतीत हे महाविद्यालय सुरु करण्यासाठी पाठपुरावा करुन राज्य शासनाकडून त्याची मंजूरी घेत बारामतीत हे विद्यालय सुरु करण्याची प्रक्रीया सुरु केली. एकदा मंजूरी मिळाल्यानंतर ठराविक कालावधीत इमारतींसह सर्व मुलभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी अजितदादांची असते, ती त्यांनी उचलली असून येत्या काही वर्षात याही सुसज्ज इमारती माळेगाव व क-हावागजनजिक दिसून येतील.

### बारामतीत साकारतेय अत्याधुनिक सेंट्रल पार्क :

सीएसआरच्या माध्यमातून बारामतीतील प्रशासकीय भवनशेजारील नऊ एकर जागेवर भव्य व सुंदर सेंट्रल पार्क अजित पवार साकारत आहेत. या ठिकाणी एक वॉच टॉवर उभारला जाणार असून त्या वरुन विहंगम दृश्य पाहता येईल. या परिसरातील नागरिकांना चार क्षण विरंगुळा मिळावा या उद्देशाने हे पार्क परदेशाच्या धर्तीवर साकारले जात आहे. याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच हे कामही पूर्ण होईल.

# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**



**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.

# उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



# खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.

**दूध आणि ॲंटीबायोटिक्स**

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

# बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.



**मसाजचे फायदे-**

▮मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

# रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?**

▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.

▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



# ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.

▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्ल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



# उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**



**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.



# ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या-फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.



**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

# केळी खाण्याचे असेही फायदे

**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**



**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# धारावीतील ज्येष्ठ नागरिकांशी पोलिसांनी साधला सवांद!



**■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक :**

ज्येष्ठांची होणारी फसवणूक त्यातून घ्यावयाची दक्षता, अनोळखी व्यक्तींकडून होणारी लुबाडणूक व कुठल्याही मोहाला बळी न पडता ज्येष्ठांनी सजग व सावध कसे राहावे या करिता गुरुवार दि.१७ जुलै २०२५रोजी सायं.चार ते सहा या वेळेत प्राऊड संस्था कार्यालय धारावी या ठिकाणी धारावी पोलीस ठाणे महिला पोलीस निरीक्षिका श्रीमती संगीता माने व पोलीस उपनिरीक्षिका सायली वारके यांनी पुढाकार घेऊन विभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सवांद साधला. आयोजित केलेल्या संवाद व सल्ला मसलत या उपक्रमात उपस्थित जेष्ठानसोबत चर्चा करून जेष्ठांना आलेले अनुभव शेअर करून होणारी फसवणूक छळवणूक सावधपणे कशी हाताळावी घटनेच्या वेळी शेजाऱ्यांशी किंवा पोलिसाची संपर्क कसा करावा. तसेच आपल्या मोबाईलचा वापर किंवा बँक खाते, एटीएम, दागिने दुसऱ्याकडून करून न घेता वेळी सावध व्हावे. यासाठी काही महत्त्वाच्या सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या.यावेळी हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघाचे श्री दिलीप गाडेकर व प्राऊड संस्थेचे नितीन सोनटक्के ही मंडळीही उपस्थित होती यांनीही जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.

पोलीस व ज्येष्ठ नागरिक यांचा संवाद संपर्क वाढावा जनजागृती व्हावी याकरिता समाजानेही पुढाकार घ्यावा आणि ज्येष्ठ नागरिकांना मदत करावी असेही आव्हान श्रीमती संगीता माने यांनी यावेळी उपस्थित समुदायाला केले. उपस्थित ज्येष्ठांच्या प्रश्नाला शंकाना संक्षिप्त स्वरूपात उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाचे शेवटी अलका साबळे व शंकर गोपींनी यांनी सर्वांचे आभार मानले.

# अनुसूचित जमातीच्या युवकांसाठी सैन्य व पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणासाठी शारिरीक पात्रता चाचणी २५ जुलै रोजी

**■पालघर ,प्रतिनिधी,**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि. पालघर, यांच्यामार्फत सैन्य व पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण हे पळसुंडे ता. मोखाडा जि. पालघर येथे सन-२०२५-२६ या आर्थिक वर्षात देण्यात येणार आहे. प्रथम पात्र प्रशिक्षणार्थ्यांची निवड प्रक्रिया करण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण हे प्रत्यक्षात भोजनाची व्यवस्था झाल्यानंतर सुरु करण्यात येईल तसे प्रशिक्षणार्थ्यांना (युवकांना) कळविण्यात येईल. तरी या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-या अनुसूचित जमातीच्या युवकांनी दिनांक २५ /०७/ २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता शारिरीक पात्रता चाचणीसाठी सैन्य व



पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण केंद्र, पळसुंडे ता. मोखाडा जि. पालघर येथे हजर राहावे. सदर निवड प्रक्रिया खालील नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार होईल. शारिरिक चाचणी दिनांक : २५/०७/ २०२५, सदर चाचणीत पात्र युवतीची लेखी परीक्षा दिनांकः २६/०७/२०२५, रोजी तर अंतिम निवड यादी दिनांकः २८/०७/२०२५. प्रसिद्ध करण्यात येईल सदर निवड प्रकियासाठी खालीप्रमाणे नुमद केलेले सर्व मुळ कागदपत्रे सोबत आणावी. निवड प्रकियासाठी येण्या-जाण्याचा किंवा राहण्याचा कोणताही भत्ता या कार्यालयाकडुन देण्यात येणार नाही.

**पात्रता पुढील प्रमाणे**

उंची किमान १६५ से.मी, वजन किमान ५० कि.ग्रॅ., छाती ७९ सेमी, ते ८४ सेमी (फुगवून), वय १८ ते २६ वर्ष, शैक्षणिक पात्रता १२ वी पास, प्रवर्ग र.ळ (अनुसचित जमाती). आवश्यक कागदपत्रे : शाळा सोडल्याचा दाखला, इ.१२ वी. पास गुणपत्रक, ) जातीचा दाखला, डोमीसाईल प्रमाणपत्र, नांव नोंदणी प्रमाणपत्र. अधिक माहिती साठी केंद्र प्रमुख यांना संपर्क करावा संपर्क क्रमांक ९९२१३४८७१५/ ८८३०९९३६८८.

# सरकारने जाहीर केली नवी स्पर्धा, ५ लाखांचे बक्षीस

## प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील.



**■मुंबई । प्रतिनिधी,**

सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच २० जुलैपासून २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येतील असे संचालक मिनल जोगळेकर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे

**स्पर्धेचे निकष काय आहेत?**

ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

**स्पर्धेसाठीचे परीक्षण कधी होणार?**

२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**विजेत्यांना किती रुपयांचे बक्षीस मिळणार?**

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे पाच लाख, दोन लाख पन्नास हजार आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना पंचवीस हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहनही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केले आहे.

# गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांसाठी, रेल्वेच्या दोन स्पेशल गाड्या सुरू करण्याची घोषणा रेल्वेने केली

**■पालघर ,प्रतिनिधी,**

कोकणात गणेशोत्सव पारंपारिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात साजरा करतात, कोकणात राहणारी अनेक कुटुंब पालघर जिल्ह्यात नोकरी, व्यवसाय निमित्त राहत आहेत, पण गणेशोत्सवानिमित्त आपल्या कोकणातील गावांना जात असतात, रेल्वेने दोन स्पेशल गाड्या सुरू करण्याची घोषणा केली आहे त्याबद्दल रेल्वेमंत्री, रेल्वे राज्यमंत्री, रेल्वे बोडार्चे अधिकारी, रेल्वेचे जनरल मॅनेजर, रेल्वेचे डी आर एम, या सर्वांचे आभार, शिवसेनेचे प्रवक्ते, व सतत रेल्वे समस्यांविषयी जागृत असणारे केदार काळे यांनी मानले आहेत .

विश्वामित्रि, रत्नागिरी एक्सप्रेस ०९११०/०९१०९ ही एक्सप्रेस गाडी पालघर जिल्ह्यात डहाणू, पालघर व वसई येथे थांबणार आहे, गाडी ऑगस्ट



महिन्यात २३ ऑगस्ट २७ ऑगस्ट व ३० ऑगस्ट रोजी आहे, तसेच सप्टेंबर महिन्यात ३ सप्टेंबर व ६ सप्टेंबर या तारखांना आहे. येताना ही गाडी २४ ऑगस्ट, २८ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर व ७ सप्टेंबर रोजी आहे .

रत्नागिरीला जाताना पालघर येथे ही गाडी दुपारच्या २.२०वाजता येणार आहे व रत्नागिरी येथे रात्री पोहोचणार आहे, तसेच रत्नागिरीहून ही गाडी रात्री सुटून पालघर येथे सकाळी ११.४८ येणार आहे.

अजून एक गाडी वडोदरा रत्नागिरी एक्सप्रेस ०९११४/०९११३ ही गाडी २६ ऑगस्ट व २ सप्टेंबर रोजी रत्नागिरी जाणार आहे,, तिची पालघरची वेळ दुपारी ३.३० अशी असेल, येताना ही गाडी २७ ऑगस्ट व 3 सप्टेंबर रोजी रत्नागिरीहून येणार आहे तिची पालघरची वेळ ११.४८ अशी असेल. पालघर जिल्ह्यातील गणेश भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री केदार काळे यांनी केले आहे.

अजून काही गाड्या कोकणात जाणाऱ्या गणपती साठी थांबवण्यासाठी लोकप्रतिनिधी व रेल्वे अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करणार आहेत असे केदार काळे म्हणाले.

तसेच एसटी बसनेही डहाणू, पालघर ,बोईसर, येथून जास्तीत जास्त एसटी गाड्या गणपती उत्सवासाठी कोकणात सोडाव्या असे आवाहन, एसटी अधिकाऱ्यांना केले आहे.

# अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत तीन महिन्यांचे धान्य वितरण करण्यात येणार

**■पालघर ,प्रतिनिधी,**

राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना (अअ ) आणि प्राधान्य कुटुंब योजना (PHH) या योजनांमध्ये लाभार्थ्यांना जून, जुलै व ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांचे एकत्रित धान्य वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यानुसार पालघर जिल्ह्यासाठी २ लाख ९९ हजार क्विंटल धान्याचे वाटप करण्यात येत आहे. सध्या हे धान्य स्वस्त धान्य दुकानांपर्यंत पोहचवण्याचे काम सुरू आहे. शासनाच्या आदेशानुसार, अअ अंतर्गत लाभार्थ्यांना २५ किलो तांदूळ आणि १० किलो गहू, तर PHH अंतर्गत प्रति व्यक्ती ३ किलो तांदूळ व २ किलो गहू देण्यात येणार आहे. जिल्ह्यात ९८,३१७ अंत्योदय कुटुंबे आणि १४,५५,८८९ प्राधान्य कुटुंब गटातील शिधापत्रिकाधारक या योजनेंतर्गत लाभार्थी आहेत.

शासनाने स्पष्ट केले आहे की, एकत्रित धान्य वितरणामुळे अफरातफर होण्याची शक्यता लक्षात घेऊन कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. जे लाभार्थी मिळालेले धान्य विकताना आढळतील, त्यांची शिधापत्रिका रद्द करण्यात येईल.

तसेच, पैशाचे आमिष दाखवून लाभार्थ्यांकडून धान्य खरेदी करणाऱ्या व्यक्तींवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३/७ नुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

स्वस्त धान्य दुकानदारांना लवकरच हे धान्य उचलण्याचे आदेश देण्यात आले असून, लाभार्थ्यांनी नियोजित वेळेत धान्य घेऊन शासनाच्या निदेशांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आणि करीअर मार्गदर्शन शिबीर संपन्न




**■पालघर ,प्रतिनिधी,**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यामध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये १ हजार रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयामध्ये या आर्थिक वर्षामध्ये जवळपास २० रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याचा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ,पालघर या कार्यालयामार्फत नियोजन करण्यात आलेले आहे. सदर रोजगार मेळाव्याकरीता आ.राजेंद्र गावित यांनी अध्यक्षपद भूषवुन कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच उपस्थित बेरोजगार युवकांना पालघर जिल्हयामध्ये तसेच भविष्यात येणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

रोजगार मेळावे जिल्हयातील तसेच महाराष्ट्रातील तरुणांना रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात येणार असुन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , पालघर व यशवंतराव चाफेकर कॉलेज, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ जुलै २०२५ रोजी, यशवंतराव चाफेकर कॉलेज, पालघर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त रेणुका तम्मलवार यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत माहिती दिली. त्यानंतर श्री महेशकुमार सिडाम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पालघर यांनी वाढवण बंदराच्या अनुषंगाने जिल्हयामध्ये उपलब्ध होणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. बेरोजगार युवकांना येणाऱ्या काळात कोणकोणत्या क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध होतील तसेच अकच्या भविष्यातील संधी याबाबत नॅशनल ज्युनीअर कालेज ऑफ सायन्स आणि कॉमर्स, वाडा व ऋषी कॉम्प्युटर एज्युकेशन, वसई येथे व्यवसाय मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याकरीता किरण साळवे आणि सुरेखा भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले. या रोजगार मेळाव्यामध्ये पालघर जिल्हयातील एकुण ८ आस्थापना/कंपनी यांनी ४१६ रिक्तपदांची नोंदणी केलेली होती. याकरीता एकुण १८१ उमेदवारांनी सदर रोजगार मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविला असुन त्यापैकी ३४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. वरील उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याकरीता महेश कुमार सिडाम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अनंत भंगाळे, प्र.प्रा.ए.औ.प्र.सं. पालघर, वंदेश पाटील, उप प्राचार्य, यशंवतराव चाफेकर महाविद्यालय, महेश कांबळे, गटनिदेशक, प्रशांत बोकंड, गटनिदेशक, बीटीआरआय, विनीता पाटील, उ॥, दिपेश पागधरे, व्यवस्थापक, पागधरे प्रशिक्षण संस्था, रमेश मोरे, स्विटी दिवाकर, नरेंद्र शिरसाठ, बालाजी माने, करुणा वैद्य यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुमित सोळंकी यांनी केले.

# लोकलचा प्रवास गारेगार होणार!

## रेल्वेच्या सर्व डब्यात एसी असणार, तिकीटदरातही वाढ नाही; मुख्यमंत्र्याची मोठी घोषणा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. लवकरच मुंबई लोकल ट्रेनमध्ये मेट्रोसारखे एसी कोचेस उपलब्ध होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली प्रवाशांना या सुविधासाठी तिकीटदरात वाढ होणार नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. या एसी कोचेसमध्ये बंद होणारे दरवाजे असतील. हे कोचेस पूर्णपणे नवे असतील, यात रेट्रोफिटिंग नसेल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये फडणवीस बोलत होते. मुंब्रा येथे मोठी रेल्वे दुर्घटना झाली होती. लोकल ट्रेनला दरवाजे नसल्याने अपघात होत असल्याचे पाहायला मिळत आहे. लोक दाटीवाटीने प्रवास करत आहेत. आज दोन क्लास तयार करण्यात आले आहेत. मेट्रो ही पूर्णपणे वातानुकूलित आहे, शिवाय त्याचे दरवाजे बंद होतात. एसीमुळे प्रवाशांचा प्रवास सुखदायी होतो. एका बाजूला मेट्रो आहे, तर दुसऱ्या बाजूला लोकल रेल्वे आहे.

लोक गर्दीत प्रवास करतात, लोकल ट्रेनच्या डब्यांना दरवाजे नसल्याने अपघात होतात, असे मुख्यमंत्री म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे लोकल रेल्वेमधील सुधारणेसाठी मागणी केली आहे. रेल्वेला मेट्रोसारखे एसी कोचेस मिळावेत. एसी कोचेसना बंद होणार दरवाजे असावेत. यामुळे तिकीटदरात एका रुपयाचीही वाढ होऊ नये अशी मागणी आम्ही केली आहे. याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून यासंदर्भात लवकरच घोषणा



केली जाईल, असे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले. लवकरच मुंबईतील लोकल रेल्वेचे डबे मेट्रोसारखे वातानुकूलित असतील हे डबे रेट्रोफिटिंग नसून नवे डबे असतील. उत्कृष्ट पद्धतीचे हे डबे, कोचेस असतील. आगामी काळात लोकल ट्रेनला बंद होणारे दरवाजे असतील. पण तिकिटात कोणत्याही प्रकारची दरवाढ होणार नाही, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. याशिवाय त्यांनी मेट्रो प्रकल्पांवरही भाष्य केले आहे. कुलाबा ते आरे मार्ग ऑक्टोबर २०२५ च्या अखेरीस पूर्णतः कार्यान्वित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. विक्रोळी-मंडाले आणि ठाणे-कल्याणसह १३ मेट्रो मार्गांवर काम वेगाने सुरू आहे. एकात्मिक तिकीट प्रणालीही लवकरच लागू होणार आहे. या प्रणालीमुळे एकाच तिकीटावर मेट्रो, लोकल, मोनो, बेस्ट आणि जलवाहतूक या सर्व सेवा वापरता येणार आहेत. हे तिकीट व्हॉट्सॲपवरही उपलब्ध होणार आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# कुणबी समाजाचे सूर्यवंशी क्षत्रिय युवक मंडळ पालघर तालुका पूर्व विभाग हेल्मेट - सिटबेल्ट सक्ती बाबत एक महत्वपूर्ण निर्णय व जनजागृती मोहीम

**■पालघर ,प्रतिनिधी,**

धावपळीच्या युगात आपले आयुष्य खूप धकाधकीचे झाले आहे, त्यामुळे कळत न कळत आपल्या कडून वाहन चालवताना चुका होतात. घाई गडबडी मध्ये कधी- कधी आपण हेल्मेट वापरत नाहीत आणि हेल्मेट घातले तर त्याचा बेल्ट लावत नाहीत, तशीच गत चार चाकी चालवणाऱ्यांची सुद्धा आहे. पोलीस दिसले की आम्ही सिटबेल्ट लावतो इतर वेळेस बिना सिटबेल्टचा प्रवास करतो... समाजात अपघाती दुःखद घटना घडली की आपल्याला सर्व काही आठवते. तेव्हा सर्व जण हेल्मेट व सीट बेल्ट बाबत सल्ले देतात पण प्रत्यक्षात आपण स्वतः कृती मध्ये काही करतच नाहीत. अशी आपल्या समोर किती तरी उदाहरणे आहेत ऐन तारुण्यात आपले समाज बांधव आपल्याला सोडून गेले आहेत. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबाचे, गावाचे आणि अर्थातच समाजाचे कधी न भरून निघणारे नुकसान झाले आहे. गेल्यावर्षी मंडळाने पदाधिकारी यांच्या साठी यशस्वी रित्या हेल्मेट व सिटबेल्ट सक्ती बाबत उपक्रम रबविण्यात आला. म्हणून यावर्षी सू. क्ष. युवक मंडळाच्या कार्यकारिणी च्या मासिक सभे मध्ये हेल्मेट व सिटबेल्ट सक्ती बाबत महत्व पूर्ण निर्णय संपूर्ण समाज बांधवांसाठी घेण्यात आला आहे.

तरी यापुढे स्वतःच्या निष्काळजीपणामुळेएक सुद्धा समाज बांधवाचा बळी जाता कामा नये म्हणून सर्व समाज बांधवाना विनंती असेल की आपण सर्वांनी या जनजागृती मोहिमेमध्ये सहभागी झालं पाहिजे. आयुष्य खूप अनमोल आहे म्हणून सर्व समाज बांधवाना विनंती आहे की, आपण जेव्हा कामासाठी घरा बाहेर पडतो तेव्हा आपण दुचाकी चालवत असताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालवत असताना सिटबेल्ट चा वापर केलाच पाहिजे. ही नम्र विनंती.

एक नियम स्वतःच्या आयुष्यासाठी व कुटुंबाच्या सुरक्षित भवितव्यासाठी.

सूर्यवंशी क्षत्रिय युवक मंडळ. पालघर तालुका पूर्व विभाग.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्याचा निर्घृण खून, शरीराचे तुकडे करून नदीत फेकले, कोल्हापूर हादरलं

**■कोल्हापूर, प्रतिनिधी,:**

कोल्हापुरातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्रामपंचायत सदस्याचा निर्घृण खून करण्यात आला आहे. लखन बेनाडे असे ग्रामपंचायत सदस्याचे नाव आहे. बेनाडे हा हातकणंगले तालुक्यातील रांगोळी गावाच ग्रामपंचायत सदस्य होते. मागील आठ दिवसांपासून बेनाडे हे बेपत्ता होते, आज त्यांच्या हत्येची बातमी समोर आली आहे.



बेनाडे यांच्या शरीराचे दोन तुकडे करून मृतदेह कर्नाटकमधील नदीत फेकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बेनाडे यांच्या खून प्रकरणी चार संशयतांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने ताब्यात घेतलं आहे. लखन बेनाडे याचा एका महिलेसोबत गेल्या काही दिवसापासून सोशल मीडियावर वाद सुरू होता, त्यामधून ही हत्या झाल्याचा तपास पोलिसांकडून करण्यात येतोय. मृतदेहाचे दोन तुकडे, अर्धवट जाळले अन्नदीत फेकले - हातकणंगलेमधील रांगोळी गावाचे ग्रामपंचायत सदस्य लखन बेनाडे यांचा निर्घृण खून केला. मारेकर्यांनी पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने बेनाडे यांचा मृतदेहाचे दोन तुकड्यांत तोडलं, अर्धवट जाळला आणि हिरण्यकेशी नदीत संकेश्वरजवळ फेकून दिला. बेनाडे आठ दिवसांपासून बेपत्ता होते, आणि ही घटना सुमारे पाच ते सहा दिवसांपूर्वी घडल्याचा प्राथमिक अंदाज तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे रांगोळी आणि परिसरात तीव्र खळबळ उडाली आहे. बेनाडे यांच्या बेपत्त्याबाबत त्यांची बहीण नीता उमाजी तडाखे गावभाग पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com